**संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ**
**(नॅकद्वारा 'अ' मानांकन प्राप्त)**

**जनसंपर्क विभाग**

---

## विद्यापीठात जागतिक पर्यावरण दिनानिमित्त वृक्षारोपण

अमरावती.

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठात जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधून वृक्षारोपण करण्यात आले. मुलींचे वसतीगृह क्र. ३ येथील जागेत सर्वप्रथम कुलगुरु डॉ. मुरलीधर चांदेकर यांचे हस्ते वृक्ष लावण्यात आले. यावेळी प्र-कुलगुरु डॉ. राजेश जयपूरकर, कुलसचिव डॉ. अजय देशमुख, वित्त व लेखा अधिकारी डॉ. शशीकांत आस्वले, व्य.प. सदस्य डॉ.एस.के. ओमनवार, रसायनशास्त्र विभागप्रमुख डॉ. आनंद अस्वार, संगणकशास्त्र विभागप्रमुख डॉ.व्ही.एम. ठाकरे, एल.एल.एल.चे संचालक डॉ. श्रीकांत पाटील, कार्यकारी अभियंता श्री शशीकांत रोडे, जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदुरकर, उपकुलसचिव डॉ. मंगेश वरखेडे, उद्यान अधीक्षक श्री अनिल घोम, सहा.कुलसचिव श्री आर.जे. सयाम, मालमत्ता अधिकारी श्री राजेश उपाध्ये, नगरसेविका सौ. प्रमिला जाधव यांनी वृक्षारोपण केले.

चारशे सत्तर एकराचा विद्यापीठाचा निसर्गरम्य परिसर असून या परिसरामध्ये सर्वच वनस्पतींसह औषधी वनस्पती सुद्धा आहेत. शहरामध्ये एकमेव प्रदूषणमुक्त असलेला विद्यापीठ परिसर असून विद्यापीठाच्या उद्यान विभागाने विद्यापीठ स्थापनेपासूनच हा परिसर निसर्गरम्य ठेवण्यासाठी श्रमपूर्वक परिश्रम घेतले आहेत. त्यासाठी विद्यापीठाला महाराष्ट्र राज्य वनश्री पुरस्कार, वनराईचा स्व. अजय किनखेडे वनशेती पुरस्कार, इंदिरा प्रियदर्शनी वृक्षमित्र राष्ट्रीय पुरस्कार, वसंतराव नाईक (सामाईक) पुरस्कार, मुंबई आणि इंदिरा गांधी राष्ट्रीय पर्यावरण पुरस्कार प्राप्त झाले आहेत.

शासनाने यावर्षी १३ कोटी वृक्ष लागवडीचे उद्दिष्ट निर्धारित केले आहे, त्याची तयारी सुद्धा उद्यान विभागाने कुलगुरु डॉ. मुरलीधर चांदेकर यांचे मार्गदर्शनाखाली केली आहे. जुलैच्या पहिल्या आठवड्यामध्ये विद्यापीठ परिसरात पाचशे रोपट्यांची लागवड केली जाणार आहे. पर्यावरण दिनानिमित्त वृक्षारोपणासाठी उद्यान अधीक्षक श्री अनिल घोम, श्री भिमराव वाठोडे आणि त्या विभागातील सर्व कर्मचाऱ्यांनी अथक परिक्षम घेतलेत.

---

प्रति,                                                    **जनसंपर्क विभाग**

मा. संपादक/जिल्हा प्रतिनिधी                                    दि. ०५/०६/२०१८.

दै.............................. अमरावती.

मा. महोदय,

आपणांस विनंती करण्यात येते की, सोबतच्या वृत्तास आपल्या लोकप्रिय वृत्तपत्रातून कृपया प्रसिद्धी द्यावी, ही विनंती.

आपला,

**(डॉ. विलास नांदुरकर)**
जनसंपर्क अधिकारी